MHKO030127082025

**संक्षीप्त फौजदारी खटला क्रं.१०२४७/२०२५**

**(महाराष्ट्र सरकार वि. ओंकार विजय चौगूले)**

## न्या य नि र्ण य

( घोषित दिनांक १० मार्च, २०२६)

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी ओंकार विजय चौगुले याचेविरुध्द गु.र.नं.१६७९/२०२४ अन्वये मुंबई पोलीस कायदाचे कलम ११५/११७ अंतर्गत लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल होवून दोषारोपपत्र दाखल केले.

**२.** फिर्यादी पुनम उमेश माळगे, पोलीस हेड कॉन्स्टेबल, शहर निर्भया पथक यांनी आरोपीविरुध्द अशी फिर्याद दिली की, दि.०३/१२/२०२४ रोजी १५.४० वा. चे सुमारास आरोपी हा पंचगंगा घाट, कोल्हापूर येथे सार्वजनिक ठिकाणी मावा खाऊन थुकून असभ्य वर्तन करताना आढळून आला. सबब, त्यांनी आरोपीविरुध्द लक्ष्मीपुरी पो.ठाणेत नि.०१ लगत तक्रार दाखल केली. आरोपी न्यायालयात हजर झालेवर त्याचे मुंबई पोलीस कायदयाचे कलम ११५/११७ अन्वये दि.०९/०२/२०२६ रोजी निवेदन नोंदविणेत आले. आरोपीने गुन्हा अमान्य करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची समर्थता दर्शविली.

**३.** सरकार पक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील मुद्दे विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, दि. दि.०३/१२/२०२४ रोजी १५.४० वा. चे सुमारास आरोपी हा पंचगंगा घाट, कोल्हापूर येथे सार्वजनिक ठिकाणी मावा खाऊन थुकून असभ्य वर्तन करताना आढळून आला व त्याने मुंबई पोलीस कायदाचे कलम ११५/११७ अन्वये त्याने गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष सोडण्यात येते.** |

**४.** सदर प्रकरणी अभियोग पक्षाने केवळ फिर्यादी श्रीमती पुनम उमेश माळगे (सा.क्रं.१) यांना तपासले आहे. अन्य साक्षीदारांना वेळोवेळी साक्षीसमन्स पाठवूनही व सदरचे साक्षी समन्स साक्षीदारांना मिळूनही ते न्यायालयासमोर हजर झाले नाहीत. तद्नंतर अभियोग पक्षाने नि.क्र-८ वर पुरसिस दाखल करून त्यांचा पुरावा बंद आला. साक्षीदाराच्या पुराव्यातून आरोपीविरुध्द पुरावा अभिलेखावर आला असलेने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविणेत आले. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

## ***का र ण मि मां सा***

### मुद्दा क्रं.१ करीता

**५.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचे म्हणजेच या प्रकरणातील साक्षीदार श्रीमती पुनम उमेश माळगे (सा.क्रं.१) यांच्या साक्षीपुराव्याचे

अवलोकन केले असता त्यांनी दि.०३/१२/२०२४ रोजी त्या शहर निर्भया पथकात कार्यरत असताना पंचगंगा घाट, कोल्हापूर येथे सार्वजनिक ठिकाणी पेट्रोलींग करतेवेळी त्यांना आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी मावा खाऊन थुकून असभ्य वर्तन करताना आढळून आल्याचे कथन करुन त्यांनी आरोपीविरुध्द तक्रार दाखल केल्याचे कथन केले आहे. परंतु, त्यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी सदर दिवशी त्यांची पंचगंगा घाट, कोल्हापूर येथे पेट्रोलींगसाठी ड्युटी असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नसून पेट्रोलींगला जाताना शासकीय वाहनाची नोंद असलेल्या लॉगबूकची प्रत याकामी दाखल केलेली नाही. साक्षीदाराने त्यांचे उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, त्यांनी पोलीसांव्यतीरिक्त इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. यावरुन फिर्यादी या दि.०३/१२/२०२४ रोजी निर्भया पथकात कार्यरत होत्या किंवा कसे, तसेच त्या पंचगंगा घाट, कोल्हापूर येथील घटनास्थळी पेट्रोलींगसाठी गेल्या होत्या किंवा कसे या प्रश्नांचे समर्पक उत्तर मिळताना दिसून येत नाही.

**६.** सबब, प्रस्तुत साक्षीदाराच्या पुराव्यावरुन फिर्यादी या घटनास्थळी पेट्रोलींगसाठी गेल्या होत्या ही मुळ बाबच सिध्द झालेली नाही. तसेच, प्रस्तुतकामी कोणताही घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेला नाही. परिणामी आरोपी हा वर नमूद घटनास्थळी असभ्य वर्तन करत होता ही बाब सिध्द प्रथमदर्शनी सिध्द होताना दिसून येत नाही.

**७.** सरकारपक्षाने आरोपीविरुध्द केस शाबीत करणेसाठी आरोपी हा वर नमूद ठिकाणी असभ्य वर्तन करत होता ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे, परंतु ते शाबीत करण्यास सरकार पक्ष याकामी असफल ठरला आहे. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांनी याकामी इतर कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व इतर महत्वाचे साक्षीदारांची साक्ष नोंदविली नाही. म्हणून आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द झाला नाही. या सर्व कारणास्तव सरकारपक्ष आरोपीविरुध्द गुन्हा निःसंशयपणे शाबीत करणेस अयशस्वी ठरलेने आरोपीला संशयाचा फायदा देवून सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करणे योग्य वाटते. सबब, मुद्दा कं.१ चे उत्तर **'नकारार्थी'** नोंदवून मुद्दा क्रं.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

| | **<u>आ दे श</u>** |
|---|---|
| **१.** | आरोपी **ओंकार विजय चौगुले** याची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८ अन्वये मुंबई पोलीस कायदा कलम ११५/११७ अन्वयेच्या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **२.** | आरोपीने दिलेले वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र हे रद्द करण्यात येत आहेत. |
| **३.** | आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ च्या पुर्ततेकरीता रक्कम रूपये ७,५००/- चे वैयक्तीक बंधपत्र लिहून द्यावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by PANKAJ BHAGATSING RAJPUT
Date: 2026.03.10 17:13:52 +0530

दिनांक १०/०३/२०२६
**कोल्हापूर**

**(श्रीमती पंकज बी. राजपूत)**
प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्रं.११, कोल्हापूर.